# प्रयोगकलांचे शिक्षण

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - केसरी वर्तमानपत्र, संपा. दीपक टिळक, १९८८, ३१ जानेवारी )

संगीत, नृत्य आणि नाट्य या तिन्ही प्रयोगकलांना भारतात दीर्घ परंपरा आहे. मात्र अनेक कारणांनी संगीत व नृत्य या दोन्हीतच शिक्षणाची भारतीय पद्धती परंपरेने चालत आलेली रीती आढळते. नाट्याचे शिक्षण आणि संबंधित बाबीत म्हणूनच काही प्रश्न उभे राहतात.

शिक्षणाच्या नमुन्याचे (मॉडेलिंग) प्राचीन सूत्रानुसार तीन मुख्य घटक : उपदेश, अभ्यास आणि प्रयोग. पहिल्याने ज्ञान शिकणाऱ्यापर्यंत पोचविणे, दुसऱ्याने सराव वा स्वाध्याय तर तिसऱ्याने जे शिकले त्याचे प्रत्यक्ष व जाहीर वापर निर्देशिले जातात.

आजच्या नाट्यशिक्षणात तिहींचा विचार होतो का? होत असल्यास कोणत्या मर्यादेपर्यंत? भारतीय परंपरेत सिद्ध झालेला आदर्श नमुना उपलब्ध नसल्याकारणाने नाट्यशिक्षणासंबधीच्या आमच्या प्रयत्नांची क्षमता आणि सयुक्तिकता कमी झाली काय?

वास्तविक पाहता ब्रिटिश कालखंडात महाराष्ट्र, गुजरात, बंगाल, कर्नाटक वगैरे प्रांतात नाटक मंडळयांच्या उदयाबरोबरच एक नाट्यशिक्षण नमुना सिद्ध झाला, असे म्हणता येईल. प्रस्तुत कालखंडातील अनेक व्यक्तींच्या चरित्रातून - आत्मचरित्रातून याची साक्ष पटते. प्रस्तुत नमुन्याची प्रमुख लक्षणे नोंदता येतील.

१) दोन प्रकारची माणसे भरती होत. नाटकाचे वेड असलेली आणि कोणतेही काम करण्यास योग्य न समजली जाणारी!

२) मुलांची भरती लहान वयात होई. स्त्री पार्ट करण्यासाठी प्रथम विचार होई. शिक्षण त्यानुसार होई. वयात आल्यावर अनुरूप वाटल्यास मुले व्यवसायात सामावली जात. पुरुष- पार्टी म्हणूनही रूप आणि आवाज चांगला म्हणून थेट नायिका/नायक पदासाठी भरती अर्थातच निवडक बाबतीत शक्य असे.

३) भरती झालेल्यांना दिले जाणारे शिक्षण व्यापक असे. आहार, व्यायाम, नृत्य, गायन आणि साक्षरता यावर भर राही. वेळापत्रके आखलेली असून त्यानुसार कारभार चाले. नियमितता, कष्ट व आज्ञाधारकपणास महत्त्व होते.

४) ध्यानात घेण्यासारखी गोष्ट अशी की, भरती झालेल्या मुलाला नाटकाचे अंग माहीत आहे की नाही, हे ठरविण्यासाठी सुरुवातीपासूनच त्याला मंचावर वावरण्यासारख्या छोट्यामोठ्या भूमिका कराव्या लागत. मुलांचे समूह नाच-गायनासाठी वापरण्याची सोय नाटकात असे. परिणामतः कच्च्या-पक्क्या सर्व मडक्यांची कसोटी लावण्याची संधी मिळे. पाठांतर व अनुकरण तंत्राची सवय लावून घेता येई.

नाटक- मंडळींमधे उत्क्रांत झालेल्या शिक्षण- नमुन्यात अभिनयाखेरीज इतर रंगमंचीय कौशल्यांच्या शिक्षणाची खास जागा नव्हती.

इंग्रजी विद्येच्या आगमनानंतर स्थिती पालटू लागली. रूढ झालेल्या नमुन्याच्या पात्रतेविषयी शंका निर्माण झाली. वास्तववाद आणि नैसर्गिक वादांना नव्या जमान्यात प्रतिष्ठा प्राप्त झाल्याकारणाने प्रयोगाच्या नमुन्याविषयीच एकंदरीने असमाधान वाटू

लागले होते. नव्या कलाजाणिवांनी निर्माण केलेल्या नव्या संविद्येस पद्धतशीर नाट्यशिक्षण इष्ट भासू लागले. सर्व रंगमंचन विभागाविषयी अधिक व्यावसायिक (म्हणजे विचक्षण व कार्यक्षम) दृष्टिकोण हवा, असे मत व्यक्त करण्यात येऊ लागले. विसाव्या शतकाच्या आरंभास नाट्यशिक्षणाचे अभ्यासक्रम तयार होऊ लागले इतकेच नव्हे तर नाट्यशिक्षणासाठी संस्था स्थापल्या जाव्यात, असेही प्रतिपादन करण्यात येऊ लागले. प्रयोगकलांकडे पाहण्याची नवी दृष्टी नवीनपणे फुलू पाहणाऱ्या आधुनिक राष्ट्रवादी भूमिकेची एक परिणती होती, आमच्या संस्थांना, चळवळींना आम्ही मदत केली पाहिजे या भूमिकेतून प्रतिष्ठित नाटक मंडळया, वर्तमानपत्रे (जी तेव्हा मतपत्रे असत) वगैरेंनी नव्या नाट्यशिक्षण कल्पनांना वगैरे आपला पाठिंबा देऊ केला.

नव्या नाट्यशिक्षण नमुन्याचे काही विशेष नोंदले असता जुन्या आणि नव्या दृष्टीतला फरक आणि इष्ट मानल्या गेलेल्या बदलाचे स्वरूप ध्यानात येईल.

अ) नव्या नमुन्यात रंगमंचाशी संबंधित विद्वत् परंपरेला स्थान होते. रंगभूमीचा इतिहास, अभिजात भारतीय नाटकांची ओळख वगैरेंना विचारात घेतले आहे.

ब) भाषणाच्या अचूकपणावर भर देण्यात येऊ लागला. नाटककाराने लिहिलेल्या शब्दांची प्रतिष्ठा वाढली. प्रयोगकर्ते अशिक्षित असल्याकारणाने प्रयोगास कमीपणा येतो या आक्षेपास धार आली.

क) रंगमंचाच्या अभिनयेतर अंगांवरही मेहनत हवी, असा विचार बळावू लागला.

परंतु १९३१ च्या आसपास प्रतिष्ठित नाटकमंडळया उतारास लागल्या. नाट्यशिक्षणास संस्थारूप देण्यासाठी पाठबळ तर हवेच होते! त्यामुळे नाट्यशिक्षणाचे पाऊल मागे खेचले गेले.

सर्व गोष्टींना लघुरूप देण्याच्या एकंदर प्रवृत्तीचा प्रभाव नंतरच्या घटनांवर दिसतो म्हणायला हवे! कमी कालावधीत अनेक विषयांना स्पर्श करू पाहणारी नाट्यशिक्षण शिबिरे प्रचारात आली. मात्र त्यांचे लक्ष्य होते सुशिक्षित स्त्रिया, महाविद्यालयीन विद्यार्थी, शाळेतील मुले वा सांस्कृतिक बाबीत रस असणारे सामाजिक गट. प्रस्तुत नाट्यशिक्षण प्रयत्नांचा भर विद्वत् परंपरेचा आढावा घेणे वगैरेंवर असे. सरकारी व निमसरकारी संस्थांच्या पाठिंब्याने आकारास आलेल्या प्रस्तुत प्रयत्नात व्यावसायिकांचा पुढाकार नसे. शिबिरात प्रत्यक्ष प्रयोगाला जास्त वाव देऊन कार्यसत्र हा नवीन शिक्षणप्रकार सिद्ध झाला. (यातही नेपथ्य, प्रकाशयोजना, रंगभूषा, यासारखी तांत्रिक अंगे दुर्लक्षित राहिली हे ध्यानात घेण्यासारखे!) लक्ष केंद्रित राहिले अभिनयावर. आजचा कार्यसत्रांचा धूमधडाका लक्षात घेता दीर्घ मुदतीच्या आणि संस्थारूप नाट्यशिक्षणास पर्याय म्हणून आपण कार्यसत्रांचा स्वीकार केला आहे, असे दिसते. असे करणे योग्य आहे काय? आजचे नाट्यशिक्षणेच्छु सुविद्य, ग्रहणक्षम आणि सांस्कृतिक बाबतीत उत्सुक असतात, असे मान्य करूनही शंका फिटत नाही. कारण हालचाल, भाषणफेक, ध्वनिमुद्रण वगैरेबाबतचे प्राथमिक शिक्षण न मिळाल्याची भरपाई लहान मुदतीच्या कार्यक्षेत्रात कशी करता येईल? सर्व सर्जनशील कलांच्या शिक्षणात पुन:पुन्हा करण्याच्या, प्रारंभिक कवायतीचा भाग पुष्कळ असतो. तो टाळून शिक्षण परिणामकारक कसे होईल? शैक्षणिक प्रक्रियेतील आवश्यक दीर्घोद्योग व तपशिलाकडे कानाडोळा करण्यास सोयीची वाट म्हणून तर कार्यसत्रांकडे शिक्षक व शिकणारे वळलेले नाहीत ना!

कार्यसत्राचे स्वरूप लक्षात घेता प्रयोगकर्त्यांचा सहभाग आवर्जून मिळवणे स्वाभाविक होते. पण यामधून एक निराळीच अडचण निर्माण झालेली आढळते! रंगानुभव घडविण्याची प्रत्यक्ष, व्यक्तिगत संधी मिळाली असल्याकारणाने प्रयोगकर्ते बोलतात तेव्हा शब्दांना वजन येते. प्रतीतीचे बोलणे हे औपपत्तिक फिकटपणापेक्षा केव्हाही जिवंत वाटते. पण तरीही नाट्यशिक्षणात गुंता निर्माण होतो. मुख्य कारण असे की, एकंदरीने कलाकारात जर कोणी कमीत कमी व्यासंगी असतील तर आमचे प्रयोगकलाकार होत! (त्यात पुन्हा नाटकवाले मूर्धन्यस्थानी!) त्यांना प्रादेशिक परंपरांची माहिती नाही. प्राचीन संचितांचे ज्ञान नाही. समकालीन अभारतीय परंपरांची

त्यांची जाणीव इंग्लंड अमेरिकेपुरती (फार झाले तर) मर्यादित! आपल्याला मिळालेल्या कंत्राटी कामापलीकडे पाहण्याची त्यांना इच्छाच होत नाही! प्रत्यक्ष अनुभवातून हाती लागणाऱ्या सुट्या प्रयोगतथ्यांची सुसंगत कल्पना म्हणून मांडणी करण्याची कुवत त्यांच्यात अभावाने आढळते. आपल्या व्यक्तिगत (कधीकधी तर केवळ वैयक्तिक) अनुभवांची कथा आळवून परंपरा कशी सिद्ध होणार, असा त्यांना प्रश्नही पडलेला दिसत नाही! स्फूर्तीचा लखलखाट पूर्ण दृष्टीच्या जागी येऊन कसा चालेल?

प्रयोगकलांचे शिक्षण आणि विशेषतः नाट्यशिक्षण कचाट्यात सापडले आहे. प्रयोगकर्त्यांनी सढळ हाताने अनुभवी दान दिल्याखेरीज त्याला आशय प्राप्त होणार नाही. पण काही पूर्वशर्ती पुऱ्या केल्याखेरीज प्रयोगकर्ता आपली भूमिका नीट बजावू शकणार नाही! आज देशभर घोंघावणाऱ्या कंत्राटयंत्रणेचे वारकरी होणे त्यांनी निदान कमी केले पाहिजे. आपल्या वैयक्तिक 'करीअर' पलीकडे वाहणाऱ्या इतिहासाचे, परंपरेचे त्यांनी भान राखले पाहिजे. एके काळी भारत खंडातले प्रयोगकर्ते विद्वत् परंपरेत सहज सामील होऊ शकत. तसे पुन्हा व्हायला हवे.